महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९

क्र.- उशिसं/पदभ/ २०२४/मवि-१/ १४१८ दिनांक- ०१.०३.२०२४
0 1 MAR 2024

## परिपत्रक

**विषय- अशासकीय महाविद्यालयामधील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक या पदांसाठीची निवड समिती देतांना होणाऱ्या दिरंगाईबाबत.**

**संदर्भ-** १.विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना दि.१८ जुलै, २०१८
२.शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.८ मार्च, २०१९
३.शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.१० मे, २०१९
४.शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग दि.१ जानेवारी, २०२४

उपरोक्त विषयी संदर्भीय शासन निर्णयानुसार कळविण्यात येते की, राज्यातील अशासकीय महाविद्यालयांतील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक या पदांसाठी उक्त संदर्भीय शासन निर्णयांमध्ये निवड समितीची रचना विहित करण्यात आलेली आहे. या निवड समितीमध्ये संबंधित विद्यापीठांच्या मा.कुलगुरू यांचे प्रतिनिधी, मा.कुलगुरू यांचे मागासवर्गीय प्रतिनिधी, विषयतज्ञ, इ.चा समावेश असतो.

राज्यामध्ये सद्यस्थितीत प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदांच्या पदभरतीसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येते. सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यासाठी वैध असते. या कालावधीतच सदर पदांची पदभरतीची संपूर्ण प्रक्रिया होणे आवश्यक असते.

राज्यातील संबंधित संस्थेमार्फत विद्यापीठांकडे पदभरतीसाठी निवड समितीची मागणी नोंदविण्यात येते. त्यावेळेस मा.कुलगुरू यांचे प्रतिनिधी, मा. कुलगुरू यांचे मागासवर्गीय प्रतिनिधी, विषयतज्ञ, इ. सदस्यांचा समावेश असलेली निवड समिती विद्यापीठाकडून संबंधित संस्थेस देताना विलंब होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. परिणामी शासनाकडून देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची मुदत संपुष्टात आल्यामुळे पदभरतीची प्रक्रिया पुर्णत: थांबते. त्यामुळे संबंधित संस्था/ व्यवस्थापन/ महाविद्यालयास ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याची संपुर्ण प्रक्रिया पुनश्च: करावी लागते. या सर्व प्रक्रियेत कालापव्यय होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.

सबब, वरील सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, विद्यापीठांकडे निवड समितीची मागणी केल्यानंतर विद्यापीठांनी कमाल १५ दिवसात निवड समिती गठीत करून संबंधित संस्था/ व्यवस्थापन/ महाविद्यालयास विद्यापीठ स्तरावरून कळविण्यात यावे. निवड समिती देण्याबाबत कोणत्याही प्रकारची दिरंगाई होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता विद्यापीठांनी घ्यावी.

**( डॉ. शैलेंद्र देवळाणकर )**
प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.